Vol 6 Issue 3 April 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

Welcome to ISRJ

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2230-7850

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

***International Advisory Board***

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

***Editorial Board***

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 3 | April - 2016

Indian Streams Research Journal

# "खानदेशातील भिल्ल (आदिवासी) समाजाचे सामाजिक जीवन"

पी. एस. सोनवणे
इतिहास विभाग , जिजामाता महाविद्यालय, नंदुरबार.

## प्रस्तावना :–

भिल्लांच्या उत्पत्तीविषयी भागवतपुराण, अग्निपुरान, महाभारत, शिवपुराण, रामायण इत्यादी संस्कृत वाडरूमय प्रकारात वेगवेगळे उल्लेख आढळतात. भिल्लांच्या कथा ऐकल्यानंतर महादेवापासून भिल्लांची उत्पत्ती झाली असावी असे वाटते. या कथांशिवाय रामायणामध्ये शबरी नामक भिल्ल स्त्रीची कथा आहे. महाभारतात किराताचा म्हणजे भिल्लांचा वेश धारण करुन शंकराने अर्जूनाशी युध्द केले. या भिल्ल जमातीमध्ये तीन प्रकारचे लोक आढळतात. (१) भिल (२) भिलाल (३) तडवी इत्यादी ही जमात नंदुरबार, ठाणे, औरंगाबाद, जळगाव आदी जिल्हयात अधिक प्रमाणात आढळते.[१]

'मुंडा' आदिवासी जमातीशी (kaularian) संलग्न असलेली आणखी एक जमात म्हणजे भिल्ल जमात होय. भारतात फार मोठया संख्येत असलेल्या आदिवासी जमातीपैकी ही एक जमात होय. मध्य भारतातील मध्यप्रदेश, राजस्थान आणि गुजराथच्या पर्वतीय भागात त्यांची वस्ती आढळते. महाराष्ट्रातील खानदेश विभागापासून पश्चिमेस सातपुडा पर्वत रांगांच्यामधून गुजरातमधील समुद्रापर्यंत भिल्ल जमात दिसते. भिल्ल हा शब्द बिल्लू या शब्दापासून आला आहे. बिल्लू धनुष्य बाणाने युध्द करीत असत. ते उत्तम शिकारी असून पुढे काही भिल्लांनी लुटारुपणाही सुरु केला. राजस्थानातील 'ढोल' ही ते आपली मूळ भूमी समजतात.[२]



• ***भिल्लांच्या शाखा*** – भिल्लांचे प्रामुख्याने दोन उपविभाग आहेत. त्यांना "हव्या" आणि 'हवाडीया' असे म्हणतात. हगामध्ये भाऊ व वडिलांच्या संबंधीतील नातेवाईक येतात. तर हगवाडियामध्ये ज्यांचेशी विवाह करता येईल असे संबंधी येतात. दोन हगांच्यामध्ये विवाह होऊ शकत नाही. म्हणजेच हगातंर्गत विवाहच होऊ शकतो. भिल्लांमध्ये गोत्रपध्दती असून २७ ते ३६ गोत्र सांगण्यात आले आहेत. गोत्रांना कुळचिन्हाच्या आधारावर विभागण्यात आले आहे. ५४ पासून १५० ते १६२ पर्यंत कुळ किंवा उपकुळ नोंदविण्यात आले आहेत. काही कुळांचे उदाहरणे (जांभुळचे झाड), रोहिणी (रोहणचे झाड), आवलिया (आवळयाचे झाड), मोरी (मोर), सोलीआ (सुर्य), घोडमाऱ्या (घोडे मारणारे) इत्यादी.[३] नंदुरबार, धुळे, जळगाव जिल्हयातील भिल्ल जमातीची लोकसंख्या १० लाख एवढी आहे. नंदुरबार, धुळे, जळगाव जिल्हयातील भिल्ल जमातीच्या अनेक शाखा आहेत. त्यात काही प्रादेशिक गटही आहेत. नंदुरबार, धुळे जिल्हयात भिल्ल (वळवी, वसावे, पाडवी, नाईक, इत्यादी) गावीत तथा मावची, पावरा, ढाणका, तडवी भिल्ल, बरडेभिल्ल हया प्रमुख शाखा असून त्यात काही प्रादेशिक गटही आहेत. त्यात प्रामुख्याने कोटलेभिल्ल, मथवाडेभिल्ल, मेवासीभिल्ल, लाढयाभिल्ल, बोंडे-गवाल, टेड भिल्ल, नायडो भिल्ल इत्यादी स्थानिक व प्रादेशिक गटांचा समावेश होतो. या शिवाय जळगाव जिल्हयात ढाणका-तडवी, तडवी भिल (मुस्लीम) असे भिल्लांचे दोन प्रकार आढळून येतात. तर नंदुरबार जिल्हयातील भिल्ल जमातीत वडवी, वसावे, पाडवी, नाईक, गावीत यांची संख्या मोठी आहे.

• ***भिल्लांची कुळे*** – भिल्ल आदिवासीत अनेक कुळे आहेत. बामणे, धानका, ठाकरे, नाईक, जंगले, इंकात, पाडवी, वळवी, तडवी, पवार, पटल्या, गावीत, मोरे, वसावे, राहासे, पावरा, भिल्ल, कोकणी, धारपवार, मावची अशी कुळांची आडनावे आहेत.[४]

• ***शेतीची व खडयाची पुजा*** – भिल्ल समाज हा शेती करणारा आहे. शेतीत जास्त उत्पादन व्हावे म्हणून निरनिराळया प्रकारची पूजा व विधी करतात. भिल्ल लोक शेतीमध्ये पेरणी करण्याच्या वेळी नांगर व इतर अवजारे पाण्याने धुतात व शेंदूर लावून त्यांची पुजा करतात. बैलांना आणि नांगराला टिळा लावतात व नंतर पेरायचे (पांमर) बिजावर शेंदूर शिंपडतात आणि सर्व देवदेवतांची नावे घेऊन म्हणतात की, आम्ही कोरड जमीनीमध्ये धान्य पेरतो, त्यांची निगा राखणे तुमच्यावर सोपविले आहे. शिवाचा देव, शेतीचा राखणदार म्हणून नागदेवाच्या नावाने धान्य बाजूला ठेवले जाते. तसेच शेषनागासाठी एक अंडे ठेऊन मग धान्याची पेरणी केली जाते.

सुगीचा हंगाम आल्यावर घरातील सर्व लोक शेतात जातात. घरधनी किंवा कर्ती व्यक्ती धान्याचे कण विधीपुर्ण करेपर्यंत नविन भाजीपाला किंवा धान्याचे कण खात नाही. कुटूंबातील प्रमुख म्हातारा व्यक्ती असेल त्याला बी लावून विधी करतात. विधीसाठी नारळ, शेंदूर, दारु, अंडे, पीठ इत्यादी वस्तू लावतात. प्रथम शेतामध्ये पेरलेले सर्व पिकांचे पिकलेले धान्य आणले जाते. उदा. मुग, भेंडी, अंबाडी, मठ, ज्वारी वैगरे पिके असतील त्याच्या थोडया-थोडया शेंगा व पिठाच्या दोन तीन भाकरी बनविल्या जातात. विधीच्या वेळी प्रथम शेतीचा राखणदार म्हणून शेषनागाला अंडे दिले जाते. सर्व देवदेवतांच्या नावाने (गांडा, ठाकूर, बेनी, हेजा) काळातल्या (भूत) यांच्या नावाने दारुमध्ये शिजविलेले भाजीभाकर वैगरे देण्यात येते व म्हणतात की, शेतात जे पेरले होते ते कडवट असेल तरी त्याचे संरक्षण केले असे बोलून सर्व देवदेवतांचे नावाने पूजा आटोपल्यानंतर तिथे कुटूंबातील लहानथोर मंडळी हातभार लावतात. त्या दिवसापासुन शेतातील कोणताही भाजीपाला खायाला सुरुवात होते. कापणी झाल्यानंतर धान्य खळयात आणले जाते. तेथेही विधी केली जाते.[४]

• ***भिल्ल विवाह पध्दती*** – भिल्ल लोकांमध्ये लग्नपुर्व व लग्नबाहय संबंध प्रचलित आहेत. पत्नीच्या मृत्यूनंतर भिल्ल पुरुष त्याच्या मयत पत्नीच्या लहान बहिणीशी लग्न करु शकतो. मेहुणीशी लग्न करण्याची पध्दती सक्तीची नसली तरी, बहूदा तिचा स्विकार केला जातो. भिल्ल लोकांमध्ये एक पत्नीकत्व व बहुपत्नीकत्व या प्रथा प्रचलित असल्यातरी बायकांना अनेक पुरुषांशी लग्न करण्यास मनाई आहे.

सातपुडयातील भिल्लांची पारंपारीक लग्न पध्दती मनोरंजकपुर्व आहे. भिल्ल समाजात नवरा मुलगा मुलीला यात्रेत किंवा बाजारात पाहतो व लग्नाची मागणी घालतो. मागणी प्रमाणे लग्न जमले नाही तर मुलगा मुलीला तिच्या संमतीने पळवून नेतो. मुलींकडून हुंडा, दहेज घेतला जात नाही. या उलट मुलांकडूनच मुलीला दहेज दिले जाते. ही रक्कम साधारणतरू ५०० पासून २००० रुपयांपर्यंत असते. लग्नासाठी मुहूर्त पाहिला जात नाही. फक्त शनिवार व अमावस्येच्या दिवशी लग्ने लावले जात नाहीत. लग्न गावातला भगत लावतो. लग्नानंतर वधु-वर मांडवात नऊ फेरे मारतात. लग्नात सर्वांना जेवण व दारु दिली जाते. लग्नाच्या प्रसंगी व रात्री लोक मोठया आनंदाने नाचतात.[६]

• ***अंतविधी*** – सातपुडयातील भिल्लांमध्ये मृत्यू झाल्यानंतर काही लोक मृताला जमिनीत पुरतात तर काही जाळतात. जाळलेल्या मृताच्या अस्थी विसर्जन केले जाते. आदिवासींच्या एकाच घरात दोन चार लोकांचे निधन झाले तर सर्वांचा एकच श्राध्दविधी केला जातो. अशा उत्तरक्रिया किंवा श्राध्दप्रसंगी सर्वांना प्रथेप्रमाणे दारु दिली जाते. दारु पिऊन मृतात्म्याला शांती लाभावी म्हणून नृत्ये केली जातात. एखादया भिल्लांचा मृत्यू झाल्यास भगत त्याची लाकडी मुर्ती करुन त्याचा जीव शोधतो. हा जीव ज्या ठिकाणी सापडतो तेथे ती मृर्ती पुरतात. त्यावेळेस मृताच्या आत्म्याला शांती लाभावी म्हणून मृर्तकाची गाणी म्हटली जातात.[७]

***हिंदू / भिल्लांचे सण[८]***

| अ.क्र. | हिंदू सण | भिल्ल सण |
|---|---|---|
| 1 | राखी पोर्णिमा | नोबरता मार्गबाबाचा |
| 2 | नवरात्र | राखी |
| 3 | दिवाळी | भाद्रबाली का जागरण |
| 4 | संक्रांत | गवरी, |
| 5 | शिवरात्र | नोवरता भेरु आणि मानाकी |
| 6 | देव झुलनी एकादस | रिवासे (दिप अमावस्या) |
| 7 | जन्माआष्टमी | मोमिंया आणि मतलोक |
| 8 | भादयनाम | हंक्रांत |
| 9 | आक्रदा तिज | माघचांद्दरचे जागरण |
| 10 | लोंदी दिवाळी | होळी |
| 11 | दसरा | शितलामाता |
| 12 | शिलसतम | निलीबारी |
| 13 | तिज | उजाडया देव ऊर्फ मोरी माता |
| 14 | होळी | वाघदेव (पोर्णिमा) |
| | | निंबादेव |
| | | गावदिवाळी |

यापैकी काही सण दोघेही साजरे करतात. राखी, नोबरता किंवा नवरात्र, दिवाळी, संक्रांत-हंक्रांत, शितलम किंवा शितलमाता-होळी,

• ***फक्त भिल्लांचे सण*** – नोबरता मार्गबाबाचा, भाद्रबाली का जागरण, गवरी, मोमिंया आणि मतलोक, माघचांट्टरचे जागरण. हिंदू सण भिल्ल साजरा करीत असले तरी, आशय, उद्देश व साजरे करण्याच्या पध्दतीत खुप फरक आहे. थोडक्यात पुर्णतरू वेगळेपण आहे.

• ***भिल्लांचे अनुसूचित क्षेत्र आणि आदिवासी उपयोजना क्षेत्र*** – जुन्या मुंबई राज्यातील पश्चिम खानदेश (धुळे) जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रात (बीमकनसमक  ातमं) नवापूर, तळोदा, अक्कलकुवा, अक्राणी हया तालुक्यांचा समावेश होता. स्वातंर्त्यपुर्व काळात हा प्रदेश सर्वसामान्य प्रशासकीय व्यवस्थेतून अंशतरू वगळलेला प्रदेश म्हणून त्यांची गणना केलेली होती. या प्रदेशात भिल्लांची छोटी-छोटी सात राज्य होती. पुढे ही राज्य '४ईन्ट्टüन्त्üईइ्' म्हणून जाहिर झाली. या इस्टेट प्रमुखांना राजे किंवा चिफटन असे म्हणत. सर्वसामान्य जनता मात्र त्यांना सरकार समजत असे. स्वातंर्त्यांनंतर अशी संस्थाने व जहागिरी भारतीय संघराज्यात समाविष्ट करण्यात आली. भिल्लाच्या सात इस्टेटींची गावे एकत्रित करुन "अक्कलकुवा" तालुक्याची निर्मिती करण्यात आली. भिल्लांच्या काही इस्टेटस् गुजरात राज्यात सुरत आणि भडोच जिल्हयात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. १९७५-७६ मध्ये मध्यवर्ती शासनाने आदिवासी क्षेत्रातील अनुसूचित जमातीची आर्थिक आणि सामाजिक स्थिती लक्षात घेऊन त्यांच्या उन्नतीसाठी खास उपाय योजना करण्याचे धोरण अंगीकारले. संविधानात दुरुस्ती करुन अनुसूचित क्षेत्र (Scheduled) म्हणून १९८५ साली घटनात्मक दर्जा देण्यात आला.

***1950 चे अनुसूचित क्षेत्र, आदिवासी उपयोजना क्षेत्र व 1985 चे अनुसूचित क्षेत्र***

| 1950 चे अनुसूचित क्षेत्र | | 1985 चे अनुसूचित क्षेत्र (Scheduled Area) | | 1976 चे आदिवासी उपयोजना क्षेत्र (TSP Area) | |
|---|---|---|---|---|---|
| तालुका | गावे | तालुका | गावे | तालुका | गावे |
| नवापूर | 93 | नवापूर | 155(1) | नवापूर | 155(1) |
| अक्राणी | 156 | अक्राणी | 163 | अक्राणी | 163 |
| अक्कलकुवा | 172 | अक्कलकुवा | 187 | अक्कलकुवा | 187 |
| | | तळोदा | 92(1) | तळोदा | 92(1) |
| | | शहादा | 145 | शहादा | 145 |
| | | नंदुरबार | 107(1) | नंदुरबार | 107(1) |
| | | साक्री | 102 | साक्री | 102 |
| | | शिरपूर | 71 | शिरपूर | 62 |
| एकूण | 421 | | 1022(3) | | 1013(3) |

• ***पाडवी, तडवी ढाणका*** – वसावे, वसावा, वळवी, पाडवी हया भिल्लांच्या अलग पोटजमाती नाहीत. भिल्ल जमातीतील ही महत्वाची कुळे (गण) आहेत. इतर भिल्ल शाखांपेक्षा ते स्वतरूला उच्च दर्जाचे समजतात. स्वातंर्त्यपुर्व काळात त्यांच्यापैकीच काही घराणी, जहागिरदार होते. भिल्ल प्रदेशात पहाडात राहणारे पाडवी, वरच्या भागात राहाणारे वळवी आणि वसाहतीत किंवा गावेकरुन राहिले ते वसावा. वसावे मुळ समाजापासून तुटलेले, दूरझालेले. 'तडवी' अशी त्यांची स्थानपरत्वे कुळ नावे आलेली असावीत. भिल्ल समाजात वसावे, वळवी, पाडवी तुलनेने पुढारलेले आहेत. नंदुरबार पश्चिम, नवापूर, तळोदे पश्चिमभाग, अक्कलकुवाचा खालचा भाग या भौगोलिक क्षेत्रात हा समाज पसरलेला आहे. या भागातील लोकांचे राहणीमान व बोलीभाषा सारखी आहे. स्त्रिया लुगडयाच्या घडीचे दोन भाग करतात. पैकी एक भाग नेसतात. व एक भाग डोक्यावरुन घेतात. त्यांची पेहराव पध्दती वैशिष्टयपुर्ण आहे. पाडवी, वसावे, वळवी कुळांचे राजे 'चिफटन' स्वतःला राजपूत (चौहान) वंशाचे मानतात. त्यांच्यापैकी अनेकांनी मुस्लिम सुभेदारांचे मांडलिकत्व स्विकारुन मुस्लिम धर्मही स्विकारला होता. त्यामुळे त्यांची संस्कृती आर्धी भिल्ल व आर्धी मुस्लिम अशी मिश्र व सरमिसळीची झालेली आहे.[१०]

•***ढाणका, तडवी भिल्ल*** – तडवी भिल्ल अक्कलकुवा तालुक्यात आहे. त्यांना 'ढाका तडवी' असेही म्हणतात. हे तडवी भिल्ल हिंदू धर्मीय आहे. कच्चे धान्य खाणारे म्हणून त्यांना 'ढाका तडवी' म्हणण्याची प्रथा पडली असावी असे काही लोक सांगतात. जळगाव जिल्हयातील रावेर, यावल आणि चोपडा तालुक्यातील तडवी भिल्ल हे मुस्लिम धर्मीय आहेत. त्यांची बोलीभाषा अलग आहे. ती गुजराथी भाषेला जवळची आहे. जळगाव जिल्हयातील मुस्लिम तडवी भिल्ल हे मुळचे हिंदूच आहेत.[११] ढाणका तडवी भिल्ल प्रामुख्याने धुळे, नंदुरबार (४४०११) व जळगाव (११०२९) या जिल्हयात आढळून येतात. सन १९८१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील त्यांची एकूण लोकसंख्या ५५,९८० इतकी होती. ढाणका भिल्लांत तडवी, तटारिया व वळवी या उपगटांचा समावेश होतो. ढाणका लोक भिल्ली तथा ढाणकी बोली बोलतात. हे लोक प्रामुख्याने नंदुरबार जिल्हयातील अक्कलकुवा, नवापूर, तळोदा, नंदुरबार व जळगाव जिल्हयाच्या सातपुडापर्वत रांगात व लगतच्या गुजराथ राज्यात आढळतात. ढाणका भिल्लांना आपला नेमका प्रदेश कोणता याचे फारशे ज्ञान नाही. परंतू गुजराथमधून त्यांचे स्थलांतर झाले हे ते अमान्य करत नाहीत. सामाजिकदृष्टया ते स्वतरूला बाकीच्या

भिल्लांपेक्षा वेगळे समजतात. परंतू भिल्लांशी त्यांचे संबंध ते नाकारत नाहीत. ढाणका भिल्लांमधील कुटूंबसंस्था पुरुषप्रधान असल्यामुळे वारसाहक्क मुलीकडे न जाता मुलाकडे जातो. ढाणका भिल्लांची घरे चौरस किंवा काटकोन चौकोणाच्या आकाराची असतात. ढाणका पुरुष धोतर, बंडी व पागोटे असा पेहराव करतो. तर लुगडे व चोळी असा स्त्रियांचा वेश असतो. स्त्री-पुरुष दोघांनाही आपले शरीर सजविण्याची हौस असते. त्यांचा विवाह सोहळा सुर्योदयापुर्वी किंवा सुर्यास्तानंतर पार पडतो. हळदीच्या दिवशी प्रथम मारुतीचे दर्शन आणि गणपतीची पुजा करुन हळदीच्या कार्यक्रमाला प्रारंभ होतो. ढाणका भिल्लात विधवा विवाह प्रचलित आहे. हे लोक निसर्ग पुजक आहेत. ढाणका भिल्ल व्यवसायाने शेतकरी व शेतमजूर आहे. मुलींचे बाळंतपण नवऱ्याच्या घरी होते. बाळंतपण करणाऱ्या बाईला होन्यानी म्हणतात. ढाणका भिल्लांमध्ये मयत इसमास जाळण्यात येते. त्याचबरोबर मयत माणसाची खाट स्मशानात नेऊन प्रेताबरोबर जाळण्यात येते. त्यांच्यात पारंपारिक पंचायत असून सर्व प्रकारचे सामाजिक व कौटूंबिक तंटे त्या पंचायतीकडे सोपविण्यात येते. दिवाळी, होळी हे सण ढाणका लोक मोठया उत्साहाने साजरा करतात. त्यावेळी नाचगाणी आणि दारुचा आनंद लुटतात.[१२]

### आदिवासी उपयोजना क्षेत्रातील गावे व लोकसंख्या 2001[13]

| अ.क्र | तहसील | आदिवासी उपयोजना क्षेत्रातील प्रमुख आदिवासी जमातीचे नावे, लोकसंख्या 2001 | 1 ऑक्टोंबर 2003 चे प्रक्षेपित लोकसंख्या |
|---|---|---|---|
| 1 | अक्कलकुवा | भिल्ल / धानका | 188295 |
| 2 | अक्राणी | भिल्ल /पावरा | 144608 |
| 3 | तळोदा | भिल्ल / धानका | 133794 |
| 4 | शहादा | भिल्ल / पावरा | 339938 |
| 5 | नंदुरबार | भिल्ल / कोकणी | 297890 |
| 6 | नवापूर | भिल्ल / कोकणी | 244404 |
| **एकूण** | **नंदुरबार जिल्हा** | | **1348129** |

नंदुरबार जिल्हयात आदिवासी उपयोजना क्षेत्रात २००१ च्या जनगणनेनुसार १३४८१२६ एवढे आदिवासी उपयोजना क्षेत्रात विविध आदिवासी जाती राहत असून त्यांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासासाठी (उन्नतीसाठी) महाराष्ट्र शासन विविध उपाययोजनांद्वारे प्रयत्न करतांना दिसून येत आहे.

### संदर्भ साधने


१) डॉ. जाधव सुदाम — आदिवासी लोकरंगभूमी प्रकाशक-सौ. सुशिला जाधव, प्रकाशन-सुलबा, औरंगाबाद प्रथमावृत्ती, १५ अहगस्ट २००४, पृ.क्र.७

२) डॉ. सौ. देवगावकर शैलजा — आदिवासी विश्व, प्रकाशक-आनंद, प्रकाशन-नागपुर, प्रथमावृत्ती जूलै २००१, पृ.क्र.४६

३)डॉ. सौ. देवगावकर शैलजा — उपरोक्त पृ.क्र.४७

४)डॉ. गारे गोविंद — सातपुडयातील भिल्ल ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा, पूर्वोक्त पृ.क्र.१२

५) माळी ए.ए. — तळोदा तालुक्यातील आदिवासी भिल्ल जमातीच्या प्रथा आणि परंपरा १९९१-९२, पृ.क्र.२८-२९

६) डॉ. गारे गोविंद — महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, प्रकाशक-अनिरुध्द अनंत कुलकर्णी, प्रकाशन-कौन्टिनेन्टल पूणे, द्वितीय आवृत्ती २००२, पृ.क्र.५०

७) डॉ. गारे गोविंद — उपरोक्त पृ.क्र.५१

८) Tribal Research Bulleting Vol. xxvi. No. 2, Sept.2003, Bi-Annual Journal of tribal research & Training Institute Pune, P.N.71

९)डॉ. गारे गोविंद — सातपुडयातील भिल्ल ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा, प्रकाशक-अनिरुध्द कुलकर्णी, प्रकाशन-कहन्टिनेन्टल, विजयनगर पुणे, प्रकाशन क्र. १३-२६, पृ.क्र.३

१०) डॉ. गारे गोविंद — महाराष्ट्रातील आदिवासी जमाती पूर्वोक्त पृ.क्र.४५

११) डॉ. गारे गोविंद — उपरोक्त पृ.क्र.४७

| | |
|---|---|
| १२) डॉ. गारे गोविंद | सातपुडयातील भिल्ल ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा, पूर्वोक्त पृ.क्र.१८-२१ |
| १३) भंगाळे अ. का. | आदिवासी क्षेत्राविषयीची व आदिवासी जिल्हानिहाय व तालुकानिहाय सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण, सहसंचालक अर्थ व सांख्यिकी संचालयानालय प्रादेशिक कार्यालय नाशिक २००३-०४, सर्वेक्षण १६ नोव्हेंबर २००६ए पृ.क्र.१६ |

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org